संगीत

लग्नसमारंभ नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक

बाळकृष्ण मनोहर मभुणे पिसरेकर यांनीं
तयार केलें तें,

"ज्ञानचक्षु" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ती १ ली, प्रती १०००.

किंमत ८ आणे.

आपल्या प्रपंचाकरितां कांहीं दिवस केलेल्या श्रमाचा परिहार व्हावा, एतदर्थ मनुष्यास स्वतःचें मनरंजन करणें इष्ट आहे. विद्वान लोकांचें चांगल्या प्रकारचें मनरंजन ह्मणजे पुस्तकवाचन हें होय. आतां वाचनास पुस्तकें कशीं असावीं हें सांगावयाचें कारण नाहीं. परंतु पुस्तक असें असावें कीं, तें वाचल्यापासून अनेक सद्‌गुणांचा ठसा मनावर उमटून या जगांतील मनुष्यांचे विचित्र स्वभाव लक्षांत यावे या हेतूनें सदर पुस्तक रचिलें आहे. शिवरामभटासारखा दलालीचा धंदा, रामभाऊ मूर्तिजापूरकर, मुलतानजी मारवाडी, संताजी पाटील यांनीं मुलीचे पैसे घेऊन लग्न करणें, मुलाचे अज्ञानपणीं लग्न करणें, ठकू मावशीचा ह्मातारे गृहस्थांचें लग्न जुळविण्याचा प्रयत्न करणें, चिटकोबाची मुलगी हिरण्यकेशी हिला तीन इसमास देण्याविषयीं चिटकोबाचें वचन, नेमलेल्या तिथीला तीन नवरे लग्नास येणें, पुढें चिटकोबानें पळ काढणें, पोलीस तपासांत चिटकोबास धरणें, न्यायाधीशाची इनसाफ करण्याची थोडक्यांत शैली, लग्नसमारंभ, सभा, बारा वर्षांचे मुलाचें लेक्चर वगैरे पहिले अंकापासून पांचवे अंकापर्यंत चटकदार भरलेलें आहे. आतां हें पुस्तक रचण्याचा माझा इतकाच उद्देश आहे कीं, एका दुःखित

गृहस्थाची स्थिति पाहून देशावर जाऊन माहिती घेऊन लोककल्याणास्तव माझें हें पुस्तक एकदम प्रसिद्ध करावें अशी मजला इच्छा उत्पन्न झाली. ह्मणून आमचे उदार आश्रयदाते मजला आश्रय देतील अशी आशा आहे. सदर पुस्तकांत कांहीं चुका असल्यास त्या मेहरबानीनें मजला कळविल्यास त्या मी पुढील आवृत्तीस दुरुस्त करीन. शिवाय ह्या पुस्तकासंबंधानें माझा हा प्रथम प्रयत्न असल्याकारणानें श्रमावर लक्ष देऊन वाचक गौरवून घेतील अशी आशा आहे. जास्त लिहून वाचकांस न शिणवितां मी आपली रजा घेतों.

पुस्तककर्ता

बाळकृष्ण मनोहर प्रभुणे

पिसेंवकर.

मंगलाचरण.

पद–किती वानु बल युवतीचे–ह्या चा०

भालचंद्रा विनय करानें नमितों पदकमलीं ॥ ईश्वरा नमितों पदकमलीं ॥ रंगभूमिवरी रंग व्हावया मति दे करण्याला ॥ ईश्वरा मति जगदिशा, करूणेशा, परमेशा तु त्वरित येऊनी बुद्धि आह्मांसी, द्यावी या कालीं ॥ ईश्वरा द्यावी ह्या कालीं ॥

संगीत

लग्नसमारंभ नाटक.

अंक पहिला.

(सूत्रधार येतो आणि मंगलाचरण ह्मणूं लागतो)
(इतक्यांत विदूषक येतो.)

विदूषक—कां सूत्रधार बावा, कशी काय गंमत, बरी आहेना ?

सूत्रधार—अरे गम्मत कसली, आज ह्या ठिकाणीं लग्नसमारंभ नाटक करून दाखविणें आहे. मग तुझें मत कसें काय आहे ?

विदू०—मग कांहो, तुह्मी आपलें लग्न करून घेतां वाटतं, मग असे करानां बरं.

सूत्र०—तें कसें ?

विदू०—ह्मणजे असे करा. तुमची जी पहिली बायको आहे तिला द्या रजा, आणि मग तुह्मी घ्या संन्यास, मग अर्थातच तुह्मी काशीयात्रेस जाणार. इतक्या खटा-

प्रस्तावना.

आपल्या प्रपंचाकरितां कांहीं दिवस केलेल्या श्रमाचा परिहार व्हावा, एतदर्थ मनुष्यास स्वतःचें मनरंजन करणें इष्ट आहे. विद्वान लोकांचें चांगल्या प्रकारचें मनरंजन ह्मणजे पुस्तकवाचन हें होय. आतां वाचनास पुस्तकें कशीं असावीं हें सांगावयाचें कारण नाहीं. परंतु पुस्तक असें असावें कीं, तें वाचल्यापासून अनेक सद्गुणांचा ठसा मनावर उमटून या जगांतील मनुष्यांचे विचित्र स्वभाव लक्षांत यावें या हेतूनें सदर पुस्तक रचिलें आहे. शिवरामभटासारखा दलालीचा धंदा, रामभाऊ मूर्तिजापूरकर, मुलतानजी मारवाडी, संताजी पाटील यांनीं मुलीचे पैसे घेऊन लग्न करणें, मुलाचे अज्ञानपणीं लग्न करणें, ठकू मावशीचा ह्मातारे गृहस्थांचें लग्न जुळविण्याचा प्रयत्न करणें, चिटकोबाची मुलगी हिरण्यकेशी हिला तीन इसमास देण्याविषयीं चिटकोबाचें वचन, नेमलेल्या तिथीला तीन नवरे लग्नास येणें, पुढें चिटकोबानें पळ काढणें, पोलीस तपासांत चिटकोबास धरणें, न्यायाधीशाची इनसाफ करण्याची थोडक्यांत शैली, लग्नसमारंभ, सभा, बारा वर्षांचे मुलाचें लेक्चर वगैरे पहिले अंकापासून पांचवे अंकापर्यंत चटकदार भरलेलें आहे. आतां हें पुस्तक रचण्याचा माझा इतकाच उद्देश आहे कीं, एका दुःखित

गृहस्थाची स्थिति पाहून देशावर जाऊन माहिती घेऊन लोककल्याणास्तव माझें हें पुस्तक एकदम प्रसिद्ध करावें अशी मजला इच्छा उत्पन्न झाली. ह्मणून आमचे उदार आश्रयदाते मजला आश्रय देतील अशी आशा आहे. सदर पुस्तकांत कांहीं चुका असल्यास त्या मेहरबानीनें मजला कळविल्यास त्या मी पुढील आवृत्तीस दुरुस्त करीन. शिवाय ह्या पुस्तकासंबंधानें माझा हा प्रथम प्रयत्न असल्याकारणानें श्रमावर लक्ष देऊन वाचक गौरवून घेतील अशी आशा आहे. जास्त लिहून वाचकांस न शिणवितां मी आपली रजा घेतों.

पुस्तककर्ता

बाळकृष्ण मनोहर प्रभुणे

पिर्सेवकर.

मंगलाचरण.

पद–किती वानु बल युवतीचे–ह्या चा०

भालचंद्रा विनय करानें नमितों पदकमलीं ॥ ईश्वरा नमितों पदकमलीं ॥ रंगभूमिवरी रंग व्हावया मति दे करण्याला ॥ ईश्वरा मति जगदिशा, करूणेशा, परमेशा तु त्वरित येऊनी बुद्धि आह्मांसी, द्यावी या कालीं ॥ ईश्वरा द्यावी ह्या कालीं ॥

संगीत
लग्नसमारंभ नाटक.

अंक पहिला.

(सूत्रधार येतो आणि मंगलाचरण ह्मणूं लागतो)
(इतक्यांत विदूषक येतो.)

विदूषक—कां सूत्रधार बावा, कशी काय गंमत, बरी आहेना ?

सूत्रधार—अरे गम्मत कसली, आज ह्या ठिकाणीं लग्नसमारंभ नाटक करून दाखविणें आहे. मग तुझें मत कसें काय आहे ?

विद्०—मग कांहो, तुह्मी आपलें लग्न करून घेतां वाटतं, मग असे करांना वरं.

सूत्र०—तें कसें ?

विदू०—ह्मणजे असे करा. तुमची जी पहिली बायको आहे तिला द्या रजा, आणि मग तुह्मी ध्या संन्यास, मग अर्थातच तुह्मी काशीयात्रेस जाणार. इतक्या खटा-

टोपी करून नंतर तुह्मी करा दुसरें लग्न. मग बायको कशी कराल म्हणाल, तर निवळ फटाकडी, हं घ्या टाळी.

सूत्र०—अरे दिवसानुदिवस तू शहाणा होत चालला आहेस! असे कोणी करत कां?

विदू०—(तोंडांत हात घालून) हो, हो, आठवण झाली. पण इतक्यांत विसरलों पहा. (थांबून) हं, हे पहा, आह्मी गेलो काशीयात्रेस, तेव्हां जातां जातां असा कांहीं चमत्कार झाला कीं, एक मोठा दांडगा आणि लठ्ठ मनुष्य माझ्या दृष्टीस पडला. मी त्याला विचारिलें, कांहो मनुष्यबावा, तुह्मी येथें एकटेच आहांत, त्यानें उत्तर केलें कीं, काय विचारता बावा, वडील गेले स्वर्गाला आणि मातुश्री गेल्या पाताळीं.

सूत्र०—अरे पाताळीं ह्मणजे?

विदू०—तुह्माला नाहीं कां माहीत. हात्तेच! मग तुह्मी अरण्यपंडितच आहांत वाटतं! अहो तिनें विहीरींत उडी टाकलीन काय, ह्मणजे नाहीं कां जाणार ती पाताळी.

सूत्र०—वा! शहाणा आहेस! बरें, पुढें काय झालें?

विदू०—पुढें त्यानें लग्न झालें नाहीं ह्मणून सांगितलें,

पण कांहो आतां हे तीस वर्षांचे राजेश्री, ह्यांचें लग्न केव्हां होणार !

सूत्र०—अरे अलीकडे गरीब लोकांचीं लग्नें होणें फार कठीण झालं आहे आणि त्यांत पैसे मिळण्याची मोठी मारामार पडते.

विदू०—मग तुह्मी आतां लग्नसमारंभ नाटक करून दाखवितां वाटतं ?

सूत्र०—होय. गणपती महाराजांची प्रार्थना मी मानसपूजेनें मवाच केली आहे. आतां तूं आपले सर्व पात्रांची तयारी कर. जा. (विदूषक व सूत्रधार जातात.)

(गोदावरी येते.)

गोदावरी—देवा, आतां काय करावं. मुलगी तर मोठी झाली. हिनें किनई माझ्या पाठीमागें मोटी काळजी लावली आहे. काल कोठलं चंपावतीचें स्थळ आलें होतें, त्यांत काय ह्मणें तीस वर्षांचा नवरा झालं, मुलीला वागविण्यास सासू नाहीं. यमनीला मी नाहीं हां बाई एवढ्या नवऱ्याला द्यावयाची, मग ते कांहीं कां ह्मणेनात. त्यांनीं मला दोन शिव्या जरी दिल्या तरी मी सोशीन, पण यमनीला नवरा करीन तो लहान, गोरा, इंग्रजी शिकलेला, झाल, हुशार असा करीन. [इतक्यांत विसाजीपंत येतात.]

विसाजी०—कां फारसा एकांती विचार चालला आहे !

गोदा०—विचार कसचा, ह्या पोरीचा रात्रंदिवस घोसरा लागला आहे.

विसाजी—मग एवढी काळजी कशाला पाहिजे आहे ? मी जें कांहीं स्थळ पहातों तें विचारपूर्वक पाहत असतो. तुह्मांस कांहीं काळजी नको आहे.

साकी.

विचार कांहीं मजला कळेना, लक्षण तुमचें खोटें ॥
अविचारानें लग्न जुळविता, होतिल तुमचे तोटे ॥
भाषण हें परिसा, उत्तम शोधा वर खासा ॥ १ ॥

विसाजी०—बस्स, बस्स, असलें भाषण मी ऐकणार नाहीं. मी जें कांहीं स्थळ पाहिलें आहे तें विचार करून पाहिलें आहे.

गोदा०—जळो तुमचा विचार. काय ह्मणे तीस वर्षांचा नवरा आणि त्याला माझी मुलगी द्यावयाची, पण मी तुह्माला साफ सांगते हो, मुलगी विहिरींत ढकलीन पण मी त्याला देणार नाहीं.

विसाजी०—तूं जर प्रत्येक कामाला हट्ट घेऊन बसलीस, तर माझ्यापुढें चालणार नाहीं आं ! हे तुला

एक वेळ वजावून सांगतो. (गोदावरी पाय आपटीत पुढें जाते. विसाजीपंत जवळ जाऊन हात धरितो.)

पद–असुनी तूं नृपा सुविचारी–या चा०

सुंदरी असे कां करिसी ॥ सुं० अ० ॥ मर्जी, माझी, तुझ्या ठायीं असुनी कशी रुसशी प्रिये राणी ॥ कन्या आपुली उपवर झाली ॥ क० आ० ॥ लोक जरी, निंदी तरी, आपुले मनीं करी सुविचारी ॥ सुशक्तीचा वर योजीला ॥ सु० श० ॥ अशक्त तरी, काय करी सुंदरी असे कां करिशी ॥

गोदावरी––(रागानें)

साकी.

शक्तीला तें काय करावें, पैसा नाहीं जवळी ॥
भिकार करंटा कोण पाहिला अणु नये माझ्या जवळीं॥
जा जा या काळीं ॥ हौस मनीं पुरी झाली ॥ १ ॥

(इतक्यांत वामन दीक्षित कांठी टेंकीत, कांठी टेंकीत येतो व दार लावलेलें आहे असें पाहून हांका मारितो.)

वामन०—अरे चितू अ, अरे चितु, अरे दार उघड दार उघड.

विसाजी०—कोण आहे दाराशीं.

वामन०—अरे मी दीक्षित आहे. (वामन दीक्षित

मनाशी) दाराला कडच्या अगळी घालून काय बेटे पण स्वस्थ निजले आहेत.

(इतक्यांत विसाजीपंत येऊन दार उघडतो.)

विसाजी०--कोण आहे ? (रोखून) दीक्षित,-

वामन०--अरे ओ, मीं दीक्षित आहे. बेट्याला ओळखसुद्धां नाहीं अँ.

विसाजी०--असे नव्हे दीक्षित, रात्रीचा समय जाणून कोण आहे आणि कोण नाहीं ह्मणून विचारिलें, दुसरें काय ?

वामन०--हं, तुला वाटलं असेल कीं, कोणी भूत बीत आलं आहे वाटत, पण गड्या तुह्मी आतांच्या काळचीं माणसें फार भित्रीं आहांत. (आंत जाऊं लागतो). (दोघे बिछायतीवर जाऊन बसतात.)

वामन०--अरे तूं शाळेंतील पोरं बिरं मागितली होतीसना ?

विसाजी०--होय.

वामन०--मग हें बघ, शाळामास्तरनीं फोटोफराड कां काय दिलंय ते.

विसाजी०--अहो, त्याला फोटोफराड ह्मणत नाहींत.

वामन०--मगरे काय ?

विसाजी०—त्याला फोटाग्राफ ह्मणतात.

वामन०—अस्सं, अस्सं, काय पण बेल्यांनीं अवघड नाव ठेविली आहेतहो. आमच्या अमलामध्यें इंग्रजी शब्द औषधालासुद्धां मिळत नव्हता, आणि आतां जिकडे तिकडे इंग्रजी, जिकडे तिकडे इंग्रजी ! अहो, आमची गंगी ती सुद्धां इंग्रजी बोलूं लागली आहे. परवा काय झालं, आमच्या गंगीची मडम ती मजकडे बडबड बडबड करीत आली, तेव्हां काय झालं, मी तिला पाहून जो कांहीं भिऊन पळालों ह्मणतां तो एक एक पाय दोन दोन हातावर, असें होतां होतां मी एका खोलींत जाऊन लपून बसलो.

विसाजी०—मग तुह्मी इतके त्या मडमेला भ्याला कांहो, अहो तीं माणसें आणि आपणहीं माणसें. फक्त धर्म वेगळा आहे

वामन०—पण कायरे विसू, आतांच्या पोरी बूट काय घालतात, झाल बुक काय वाचतात.

विसा०—अहो, पुरुषाला जर शिक्षण पाहिजे तर मुलींना कां नको आहे ?

वामन०—अरे पोरीनाका शिक्षण द्यावयाचे, धिःकार असो तुमचेपुढें.

फटका.

ऐका मुलींनो माझे बोलणें ॥ टाकोनी घावें तें शिकणें ॥ वृद्धापकालीं कन्या चांगली इंग्लिश शब्दें करण्याला ॥ ऐका मुलींनो ॥ मुलींना तें शिक्षण घावें पतिउद्धार करण्याला ॥ ऐका मुलींनो ॥ शाळेमध्यें जाणें रुचते परपुरुषातें बघण्याला ॥ ऐका मुलींनो ॥ स्वधर्म तुझी टाकुनी दिधला अधर्मी तुह्मी कां बनला ॥ ऐका मुलींनो ॥ १ ॥

वामन०---बर चिंतु येतो आतां. आमची गंगी वाट पाहील.

विसाजी०---बरें आहे, या. (जातो) (विसाजीपंत मनाशीं) आतां हा फोटोग्राफ आमचे मित्र वामन दीक्षित यांनीं आणून दिला आहे. तरी हा मुलगा आपण समक्ष पाहून यावा हें बरें. (जातो).

(गोदावरी येत. आणि मनासी-)

गोदावरी—आता किनई माझ्या मनाप्रमाणें झाल, मुलगा गोरा, बारा वर्षांचा, इंग्रजी शिकत आहे, झाल हुशार, जणू ब्रह्मदेवानेच ह्यां दोघांच्या पूर्वीं गाठी बांधून ठेविल्या होत्या कीं काय, कोण जाणें.

पद–चाल–(शोभा उपवनींची.)

पत्र पाठविले सवेग लग्न आजी जुळेल ॥ वडे पापड्या

पापड सांडगे करण्याला जाते ॥ सखेग कर० ॥
॥ पत्र पाठविलें ॥ बुंदी मोतिचुर घिवर मांडे तयार
करिते ॥ सखेग तयार० ॥ पत्र पाठविलें ॥ अन्य
तऱ्हेचें वनस्पतींचें मसाले करिते ॥ सखेग मसाले ॥
पत्र पाठ० ॥ १ ॥

गोदावरी—माझी बाई मोठी गडबड उडून राहिली आहे. अझून वळवटाला पत्ता नाहीं, झाल, पापड पापड्या तयार नाहींत. कसं सामान तयार होईल, ह्याची बाई मला मोठी काळजी येऊन पडली आहे. आणि दिवस तर अगदीं जवळ येऊन ठेपले आहेत. जातें आतां.

(जाते) (विसाजीपंत येतो)

विसाजी—(मनाशी) नवरा नवरीचा खूप जोडा जमला आहे आँ, ह्मणजे मुलगा बारा वर्षांचा आणि मुलगी दाहा वर्षांची, ह्मणजे कांहीं गैर नाहीं. आतां येवढ, लग्न होऊन गेलं, ह्मणजे मी पार पडलों. आमचा वामन दिक्षीत अझून कां बरं येत नाहीं.

विसा०—(रोखून पाहातो.) हो आले वाटतं,

(वामन दिक्षीत येतो)

विसा०—या तुह्मीं दिक्षीत, असे बसा, (दोघे बसतात)

विसा०—लग्न तर जुळलं दिक्षीत ?

वामन०—आँ लग्न जुळलं.

विसाजी०-होय मुलगी छतीसगुणी आणि मुलगा बतीस गुणी ह्या प्रमाणें त्यांचं टिपण जुळले आहे.

वामन०-अरे पण किंतू मुलगा राक्षसगणी तर नसेलना, नाहींतर माझी लाडकी यमनी, मेठी गुणाचिहो, स्वरूपानें तरी, काय सुंदर आहे पण,

विसा०-ह्मणूनच मी असा जोडपा पाहिला आहे.

विसा०-बरें आहे तर. दिक्षीत तीथ पंचमीची नेमिली आहे.

वामन०-आरे पंचमीच्या दिवशीं तर आमचे वडलांचे श्राद्ध आहे. तर असें कर कीं, एक दिवस लग्न पुढें ढकल ह्मणजे झालं,

विसाजी०-लाभलेली तीथ, कायम केलीच पाहिजे, त्यांत असे कसें होईल, (दिक्षीत कपाळास हात लावून)

वामन०-मग तुह्मीं आमचे, एक दिवसांचे लाडू बुडीवणार.

विसा०-आहो तुह्मांला लाडू मिळत नाहींत वाटत !

वामन०-अरे असा सोन्यासारखा दिवस वारंवार कधि घडून येणार!

विसा०-बरे आहे ज्योतिषाला विचारून जी तीथ लाभेल, तीं कायम करूं

वामन०–ठीक आहे तर मग, चला आतां.

(पडदा पडतो)

(गंगी गोदी विठी अशा मुली येतात.)

गंगी०–काग पण गोदे तुला समजले कां ?

गोदी०–छंग, मला नाहीं समजले सांग पाहूं!

गंगी०–आग जावईबुवाची, लग्नात मोठी फजीति झाली.

गोदी०–आग फजीति ह्मणजे नवराच जर लहान आहे. मग फजीति नाहीं कां, होणार?

गंगी०–आमचीं पण अवस्था तीच आहे. आग किनई आमचे (बोट करून) जे आहेत. त्यांच वय सारं चौदा वर्षांच आहे. त्यात माझा तसा प्रकार झाल्यास सात महिने झाले. पण मेल, जिवाला मोठी हुरहुर वाटते.

गोदी०–ह्मणूनच नवऱ्याचे वय निदान पंचवीस वर्षांचे असावें आणि नवरीचे वय निदान दाहा वर्षांचे, नाहीं तर केला वरण भात.

गंगी०– एकूण गोदे, तुला ह्मातारा नवरा आवडतोना, बरग बाई तुला ह्माताऱ्या नवऱ्याची गोडी लागली आहे.

गोदी०–आग त्याला का ह्मातारा नवरा ह्मणावयाचा ! लहान मुलासी लग्न लावून, येथे का, भातकुलीचा खेळ खेळावयाचा आहे. होय उगीच कांहीं तरी बोलतीस.

(विठी येते)

पद–दूता जा, जा जा जा– ह्या चालीवर

वा वा वा, वा वा वा किती, सज्ञानी सगुणी ॥
वय कमि तो नवरा, असुनि काय करावें ॥ मुलींचें,
भाषण हें प्रिय वाटें, किती सज्ञानी सगुणी ॥ वा
वा वा, वा वा वा ॥ पंचविशी नवरा, शक्तिवान
तोचि खरा ॥ तोचि बरा, नवरा खरा, मदन हरा,
किती सज्ञानी सगुणी ॥ वा वा वा० ॥ १. ॥

विठी—ऐका, पुरुषांच पूर्वी शरीर कसं होतं आणि लग्नाची पद्धत.

पद–पूजा करूनि येते चला–ह्या चाली०

पूर्वींचि ती रीत कसे, जुन्या माणसां पुसा कसें ॥
वडीलासी, स्मरा त्यांसी, हेंचि आपुलि धर्मरिती ॥
पंचवीसापरि लग्न नसे ॥ मुलास जन्म तिस वर्षे
वडीलासी, स्मरा त्यांसी, हेंचि आपुलि धर्मरिती ॥
व्याघ्रासम तो पुरुष दिसे ॥ पहा शक्तिचें तेज कसें,
वडीलासी, स्मरा त्यांसी, हेंचि आपुलि धर्मरिती ॥
पुरुष स्त्रियांचें भाष्य नसे ॥ ऋतू परि ज्या स्पर्श नसे
वडीलासी, स्मरा त्यांसी, हेंचि आपुलि धर्मरिती ॥१॥

विठी—बरका गंगुबाई हें शक्तीचं काम आहे, फुकटचं नाहीं हो. नाहीं तर केळा चौदा वर्षांचा नवरा,

त्याला नकाका नीट धोतर नेसतां येईना. बरं, येतांना गडे बागेंत ?

गोंदी—चला. (जातात)-

स्थल बाग—(लहान लहान दोन मुलें येतात.)

रामा—गोंद्या, एक गम्मत झाली गडच्या.

गोविंदा—कोणतीरे रामा, सांग पाहू.

रामा—अरे आमच्या बायकोला न्हाण आलं आहे आणि आमच्या बाबानीं उद्यापासून जोर काढण्यास सांगितलं आहे. तर गडच्या आपण उद्यांपासून तालमींत जाणार, जोर काढणार, पावशेर पावशेर दूध पिणार, तूं येशील का, ह्मणून आजच तुला मी विचारण्यास येणार होतों पण बरी अनायासा गांठ पडली, मग कसें काय, येसीलना ?

गोविंदा—अरे तुझ्या बायकोला न्हाण आलं आहे आणि त्यात आह्मांलारे कशाला जोर काढण्याची मेहनत ?

रामा—अरे, तुझ्या बायकोला नाहीं का न्हाण येणार ? किनई गोविंदा, बाबांनीं खरोखर सांगितल आहे कीं, आपण जोर काढले ह्मणजे बायकोशीं कुस्ती करण्यास ठीक पडेल.

गोविंदा—अरे बायकोसी कुणी कुस्ती करत कां, पुरुषासी करावी.

रामा—मग आपले तर बाबांनीं असं सांगितलं आहे बुवा.

गोविंदा—अरे तुझ्या बापानें तसें नसेल सांगितलं· किंवा तुझ्या बायकोला न्हाण आले आहे आणि त्यांत तुझे अंगांत कांहींच ताकद नाहीं ह्मणून कदापि सांगि. तलं असेल.

रामा—

पद—कांचे करिशी लग्न माझें—ह्या चाली०

मम भार्या त्वरित वाढे, माहादेवा तुज कळे ॥
मातेनें पितासी सांगोनि, हट्ट घेउनि, शहाणा ह्मणवूनि, लग्न करवीलें माहादेवा तुज कळे ॥ मम भार्या० ॥
पूर्विच्या रीति सोडूनि, कलिसि मानुनि. धर्म सोडुनी, लग्न करवीलें, माहादेवा तुज कळे ॥ मम भार्या० ॥
लग्नाचि गरदि करुनि, लहान पाहोनि, हुंडा घेउनि, लग्न करविलें, माहादेवा तुज कळे ॥ मम भार्या ॥१॥

सभाजनास प्रार्थना आहे कीं, मी एक भाषण करणार आहे तरी त्याकडे लक्ष देणें.

मी वडलांना पुष्कळ वेळां सांगितलें की, माझें लग्न इतक्यांत करूं नका, परंतु आमचे ऐकतो कोण? आ-

णखी त्यांत आमचेजवळ पैसे झाले आहेत पुष्कळ. मग काय विचारतां, ऐटीनें लहानपणीं लग्न करून टाकतात; परंतु दूरवर लक्ष देत नाहींत. पहा, माझें वय चौदा वर्षांचे, आणि आमचे कुटुंब बारा वर्षांचें, हें मला शोभेल काय? अहो, लग्नामध्येंच माझी जी कांहीं फजीति झाली ती सांगतां सोय नाहीं. तरी मुलाचें लहानपणीं लग्न करणें ह्मणजे हें एक त्याचे फजीतीला मूळ कारण होय. (थांबून) आतां आमच्या ठकू मावशी यांचा लग्न जुळविण्याचा प्रयत्न आणि ह्मातारपणीं बायको करणें आणि त्यापासून होणारी फजीति हा विषय पुढील अंकांत दर्शविला जाईल. (पडदा पडतो.)

अंक १ ला समाप्त.

अंक दुसरा.

[ठकू मावशी हातामध्यें माळ घेऊन जपीत येते, आणि राम राम असा तोंडानें उच्चार करीत येते तेथें येऊन स्तब्ध बसते. विदूषक ठकू मावशीजवळ येऊन]

विदूषक—अहो आजीबाई, अहो आजीबाई डोळे उघडा, डोळे उघडा. (ठकू मावशी डोळे उघडीत नाहींसे पाहून) कांहीं हाळचाल दिसत नाहीं, आतां काय करावें ? (इतक्यांत दुसरा गृहस्थ येतो.)

गृहस्थ--अरे तूं काय आरंभिलें आहेस ?

विदू०—अहो आजीबाई बोलत नाहींत. (रडूं लागतो.)

गृहस्थ—अरे, त्या जप अनुष्ठानाला बसल्या आहेत. त्यांचे अनुष्ठान झाल्याखेरीज त्या बोलणार नाहींत.

विदू०—मला असं वाटलं, आजीबाई हंः (चुटकी वाजवून दाखवितो.)

गृहस्थ—वा ! तूं शहाणा आहेस ! एकूण त्यांना तूं कैलासपंथी जाण्याची वाट पहातोसना ?

विदू०—छे हो, असें कसें मी करीन! त्या बोलत नाहींत ह्मणून मी ह्मटलं. बरं, पण कांहो त्या जिवंत आहेतना ?

गृह०—अरे, जिवंत ह्मणजे त्या अनुष्ठान करीत आहेत.

विदू०--ह्मणजे त्या सोम्या ह्मसोबाचे असेल.

गृहस्थ–अरे असेल त्यांचा कोणी एक कुलस्वामी. बरें पण तूं येथे कशा करितां आलास?

विदु०–(हसून) आह्मीका, तुह्मांला नाहींका माहीत? आमचा तर बुवा धंदा असा आहे कीं, इकडून जाणें तिकडून येणें, तिकडून जाणें इकडून येणें !

गृहस्थ–मग येतो°कां ब्रह्मपुरीस?

विदु०–अहो आमची ब्रह्मपुरी हीच, ह्मणजे एका पायांत स्टाकिन्स, तर दुसरें पायांत विजार आणि एका पायांत पायमोजा तर दुसरे पायांत बूट !

गृहस्थ-हात् वेड्या ह्मणजे तुला असेकां चार पाय आहेत.

विदु०–तुह्मांला किती दिसतात ?

गृह०–आह्मांला दोन दिसतात.

विदु०–मग तितकेच समजा.

गृह०–मग चल तर ‘ जाऊ आपण ’ (जातात).

(ठकूमावशी रामाहो असा उच्चार करून माळ खालीं ठेविते).

ठकूमावशी–आमचे शिवरामभट हे फार सज्जन म-

नुष्यहो, आणि त्यांच सोवळं तरी काय कडकडीत पण आमच्य सारख्या बायकांच, इतक जरी आहे तरी तें सुध्दां त्यांना पटत नाहीं. असो परवां सिरवणेकर यांच लग्न जुळवून दिल त्यामध्यें शंभर रुपये आणि एक लुगड मिळाल, आतां त्या गोविंदरावच लग्न जुळवून द्यावयाच आहे पण मेल्याच्या मिशा झाल्या आहेत पांढऱ्या. त्याला मीं दोन वेळा सांगितल कीं, तूं कलप लाव पण त्याच ऐकतो कोण ! येऊन जाऊन मावशीबाई मावशीबाई ह्मणून गोंडा घोळीत येतो, परंतु लग्न कसे होईल, व तें कसे जुळेल त्याची त्याला काळजी कोठें आहे. तसच त्या चिंतामणरावच लग्न जुळवून द्यावयाच आहे. त्यानें मात्र मला तीनशें रुपये देऊं केले आहेत. पण मेला तो झाला आहे म्हातारा, तोंडाचे गालगुच्चे बसलेत, झाले दांत पडलेत, आतां बाई ह्या म्हाताऱ्या माणसांना येवढ ढोंग कशालाहो पाहिजे ! लग्न करून मग त्या बायकोनें त्यांचे नांवानें रडावं कां हसावं कांहीं तरी मेली लाज ! ज चांगले जवान आंगानें धट्टाकट्टा त्या मेल्याजवळ पैसा मिळावयाचा नाहीं. आणि आज काल पैशाला मान. बरें असो. अगोदर त्या चिंतामणरावच लग्न जुळवून द्यावयाच आहे. त्याची वाट कशी लावावी ? ह्याची मोठी काळजी पडली आहे. (तोंडाला बोट लावून)

ठकुमावशी—हो चिंतामणरावाचा मुलगा पैसे पटेतोंपर्यंत दाखवावा म्हणजे झाल आणि मग आइत्या लग्नाच्या वेळेस चिंतामणरावाला हजर करावा. मग वेळेला कोणी हरकत जरी केली, तर मग मी नावाची ठकुमावशी आहे. (उठूं लागते)

ठकु०—रामाहो असा उच्चार करून निघून जाते.

(शिवरामभट दलाल येतो)

शिवराम०—मी तर बुवा ह्या दलालिच्या धंद्याला कंटाळलो आहे. आपले ढोंग लोकांच्या नजरेस येऊ नये म्हणून मी रामदासी वेष घेतला आहे. प्रातःकाळीं वेष घेऊन चार घरें फिरावी लागतात. नंतर दहा वाजेतोंपर्यंत सामुद्रीक लक्षणें पाहावीं लागतात. आणि मग संध्याकाळपर्यंत ह्याचे पागोटें त्याला आणि त्याचे पागोटें ह्याला हाच धंदा, दुसरा कांहीं नाहीं. परंतु स्वतःच्या जिवाला बिलकुल सुख नाहीं. पण पैसा रेट मिळविला आँ.

पद—रामा तूं माझा यजमान—ह्या चालीवर.

पैशाला मान ॥ आजकाल पैशाला मान ॥ अक्षरशुन्य असोनी कांहीं लक्ष्मींवंत वदती ॥ आज काल पैशाला मान ॥ पैशासाठीं अकर्म करिती ॥ पैशासाठीं प्राण वेचिति ॥ पैसा हा प्यारा ॥ आजकाल पैशाला मान ॥

शिवराम०—जातो आतां त्या भिवरगांवच्या मुलीचें लग्न जुळविणें आहे. जातो.

चिंतामणराव मान हळवीत हलवीत, काठी टेंकीत काठी टेंकीत येतो.)

चिंतामण०—आमच्या मंडळींना कयसं न्हाण आल आहे, मग त्यालाहो आपल्याला काय करावयाच आहे. त्यांत आह्मी पडलों म्हातारे. तरणेताठे असतो तर एका पायांवर उभे असतो. आमची मावशीबाई तरी किती लुच्ची आहे पण, तिनें काल रात्रीं तर झोंप कसलीती येऊं दिली नाहीं. आतां जरा येथें पडावं (चिंतामणराव निजतो. मावशीबाई येते व हांका मारते.

मावशी०— (चिंतामणरावच्या तोंडावरचा पदर काढून हांका मारते)

मावशी०—चिंतामणराव, चिंतामणराव, अहो चिंतामणराव (चिंतामणराव खडबडून उठतो).

चिंतामण०—कायहो, मावशीबाई माझ पाठिमागें कटकट लावली आहेहो.

मावशी०—आहो तुमची बायको वाट पहात आहे.

चिंतामण०—मग त्यांना जाऊन कळवा, कीं तूर्त सवड नाहीं.

(पुनः निजू लागतो, मावशीबाई हात धरून उठवते)

मावशी—अहो आंतमध्यें छपरीपलंग आहे त्यावर जाऊन निजा. असे घोंगडीवर काय पडतां-

चिता॰—अहो त्या छपरीपलंगाला ढेकूण फार झाले आहेत ह्मणून मी आपला येथें निजलों आहे. पण मावशीबाई तुम्हाला एवढी उठाठेव कशालाहो पाहिजे ?

माव॰-मग बायको करावी कशाला ?

चिता॰-बायको करावी कशाला, पोरासोरांना आई नव्हती म्हणून केली.

माव॰—मग तिनें कां तुमच्या नावानं रडावं ?

चिता॰—मोठ्यानें हंसावें.

(मावशीबाई पाय आपटीत आपटीत निघून जाते.

चिता॰—गेली एकदांची ब्याद. काय पण उठाठेव लावली होतीहो, त्या मावशीबाईला उद्योगच नाहीं. आतां मी निवळ झोंप घेईन. (पडदा पडतो.)

अंक २ रा समाप्त.

अंक तिसरा.

[चिंतामणराव येतो]

चिंता०—पहा, म्हातारपणीं लग्न करणें म्हणजे आम्हासारख्या गृहस्थांना शोभत नाहीं. तरी म्हातारपणीं लग्न केलें असतां असा आम्हांसारखा वाईट परिणाम होतो. तरी आमचेसारखे म्हातारे गृहस्थांनीं लग्न करूं नये हेंच बरें आहे.

[जातो.]

(गोपाळभट, रामभट व गणपतराव येतात.)

गोपाळभट—या तुम्ही रामभट, कशी काय हालहवाल, बरी आहेना ?

रामभट—आहो हालहवाल म्हणजे काय विचारितां, पोरीच्या पैशावर निवळ चैन आहे.

गोपाळ०—मग मुलीचे पैसे तुम्हीं घेतां वाटतं ?

रामभट—आहो घेतो म्हणजे, असे एकीचेका, चार मुलींचे पैसे घेतले.

गोपाळ०—तुम्ही बरेबुवा पैसे घेता, असें आमचे नाहीं धाडस होणार. मुलीचे पैसे घेणें म्हणजे हें मोठें पातक आहे.

रामभट—कोठून तुम्ही शास्त्रार्थ काढला आहे कोण जाणें. आहो आमचे तालुक्याला, एकजात, एकसोट, असे चाळीस नवरे बिन लग्नाचे पडले आहेत. आहो जवळ पैसे असतील तर लग्न, नाहीं तर विचारतो कोण ?

गोपाळ०—पद—मजवरती खचित आहे—ही चाल.

पैसा हा घातकारी सूज्ञानीं उमजणें ॥ पैशाचा त्याग केला ऋषिवर्गीं साधुनें ॥ साधुंची कीर्ति ऐका धर्मानें वर्तणें ॥ अधर्मानें वागणेंचि परमात्मा कोपणें ॥१॥

राम०—ते सर्व गुंडाळून ठेवा. मला तर बुवा पैसा पाहिजे, मग तुह्मी कांहीं ह्मणा. अहो, मी एका पैशाकरितां दहा कोस लांब जातो हें तुह्माला नाहीं कां माहीत ?

गोपाळ०—अहो, आजकाल कलीचें मान जर तसें आहे तर तुमच्याकडे काय दोष !

राम०—अहो तुह्मी एवढे नाकांनीं वांगीं सोलता, मग ते आपले मूर्तीजापूरकर यांनीं नाहीं कां मुलीचे पैसे घेतले ?

गोपाळ०—तें बरोबर आहे. आतां दहा लोक जसे वागतील तसे आपणालाही वागले पाहिजे.

राम०—बरे आहे, तर चला आतां, मी एकाचें आमंत्रण घेतलें आहे.

गोपाळ०—चला तर. (जातात.)

राम०--अगये त्या रंगीला पाठवून दे पाहूं,

(रंगू येते आणि एका बाजूला काहीं वेळ उभी राहून निघून जाते)

गण०--मग कसें काय रामभाऊ ?

राम०—हें पहा, सातशे रुपयाला कवडी कमी पडणार नाहीं. मर्जी असल्यास घर आपलें आहे.

गण०—(मनाशी) आतां घरेंदारें विकून ह्या बोवांची भेंडी भरली पाहिजे. (उघड) बरें आहे, तर आजपासून आठ दिवसांनीं पैसे घेऊन येतो. नंतर तीथ निश्चय वगैरे करूं.

राम०—पण लौकर याहो, मला आतां अवकाश राहिला नाहीं.

गण०-ठीक आहे, नमस्कार.

राम०-नमस्कार. (गणपतराव जातो.)

राम०--(मनाशी) मी सात पोरींचीं लग्नें केलीं, परंतु एकीलासुद्धां पैसा सोडला नाहीं आणि परमेश्वरानं माझें कल्याण केलें. आतां ह्या पोरी होत्या ह्मणून कसें तरी दोन पैसे हातीं लागले. नाहीं तर मनुष्याला एक पैसा मिळण्याची मारामार पडते. परंतु तसा कांहीं प्रसंग परमेश्वरानें आणला नाहीं. आतां हे जे पैसे येतील, ते व्याजी लावावे ह्मणजे झालें. (थांबून) कोणाला द्यावे

बरे ? हो, बरी आठवण झाली, आपले लिंबाजी पाटील याचे मुलाचें लग्न होणें आहे, तरी त्याला कर्जाऊ द्यावे हें बरें आहे. जावं आपल्या उद्योगाला.

[विदूषक येतो.]

विदू०—अहो असे इकडे या बरं.

राम०—कां ? एवढें जरूरीचें काम आहे वाटतं ?

विदू०—हें पहा, आह्माला ह्मणजे स्वतःला समजला का तुह्मी ?

राम०—होय समजलों.

विदू०-बाराशें मुलीं आहेत !

राम०-अबबब ! तुला का बाराशें मुली आहेत ?

विदू०—वरचीं दोन शून्यें काढून टाका पाहूं ?

राम०—टाकलीं. एकूण तुह्माला बारा मुली आहेत.

विदू०-(हंसतो) ओ हो हो हो हो ! बारा मुली आहेत.

राम०-मग तुझें काय ह्मणणें आहे ?

विदू०-हें पहा, आमच्या मुलीची विक्री करणें आहे, तेव्हां गिऱ्हाइक कसें घेऊन याल ह्मणाल तर तर पैसा रोख आणि माल चोख ! हं द्या टाळी !

राम०-अरे मुलीची कोणी विक्री करत का.

विदू०—नाहींहो, विक्री कोण करतो, ह्मणजे पैसे घेतो ! (जातात)

[भागूजी येतो.]

भागूजी-काय कराव परमेसरा, अझूनशान लगीन नाहीं. आमचा ह्यातारा सोयरीक पाहून पाहूनशान द-मला. पर ज्यो त्यो पैसा मांगतोया. आन बघा मला तीस वरसं होऊनशानी गेली. तवा इचाभैन लगीन कवा व्हनार ? झालं, पोर कवा व्हनार ! इच भैन मी लई तरासून गेलोय बघा.

पद. चाल लावणी

सुख कंच नाहिं जीवाला ॥ सुख० ॥ हुरहुर वाटे मनाला ॥ हुरहुर वाटे०॥ म्हराठ्यांत जन्म घातला ॥ म्हराट्यांत० ॥ आऊत हाकुनशान तो मेला ॥ आऊत० ॥ आह्मी लोक कर्जबाजारी ॥ आम्ही० ॥ साहुकार बसत्यात दारी ॥ साहुकार० ॥ पैसा हाये आमुच्या हातीं ॥ पैसा० ॥ तवा नवरी चालून येती तवा० ॥ १ ॥

गरीबाचं लगीन ह्मनजे पैसा पाहिजे बघा. आतां बघावं कांहीं कर्ज बिर्ज काडून. कुठं जुळलं तर बरच है, नाहीं तर मंग हा पठ्या लंगोटबंदचे लंगोटबंद !

[जातो]

[संतराम पाटील बसले आहेत तों भागूजीचा बाप लिंबाजी हा येतो.]

लिंबाजी—राम राम पाटील.

संतराम—राम राम. या बसा असं. (लिंबाजी जाऊन बसतो.)

संताजी – कुनिकडून येणं झालं ?

लिंबाजी—असच सोयरिकीसंबंधानं येनं झालं.

संता०—आपून कुठल राहनार ? तुमची इथं कांहीं वळख बिळख है ?

लिंबा०—इथल रामजी गावड यांना आमचे भाऊबंदाची पोर दिली हाये.

संता०—मंग बराबर हाये, समद पटल. [इतक्यांत संताजीची मुलगी ठकी भाकरीचे गाठोडें घेऊन शेतास जाण्यास निघते. तें पाहून संताजी हाका मारतो.] आग ए ठके, ठके ठके, आग ए ठके.

ठकी–आव काय ह्मनता तरी बाबा.

संताजी–आग हिकड ये, हिकड ये.

(ठकी धांवत धांवत संताजीजवळ येते.)

संताजी–आग तुला पहान्याकरितां पाव्हन आल्याती. (डोक्याकडे पाहून) आग इच्याभैन झिंज्या बिंज्या तरी वाईशा सांवर. जनुका जशी कंजारीन. (ठकी केस

सावरून पाव्हण्याजवळ येते) बगा पाव्हन, ही आमची पोर; असा जोडा जमला पाहिजे बघा.

लिंबाजी–आमच्या पोराची उमर बघा. लई झाली तर तीस वर्सांची.

संताजी–ठीक आहे जोडा.

लिंबाजी–(जरा दम खाऊन) मग कसं काय ?

संताजी–दोनशें रुपये ठिवायला द्या. आन एक येळाचा जोड, आन बघा पुतळ्याची माळ इतक घेऊनशान या आन आपला नवरा पिवळा करून घ्या.

लिंबाजी–वर हैतर. पाच चार दिसान येतो जातो आतां रात व्हयाला आली रामराम. (दोघे निघून जातात. पडदा पडतो.)

[मुलतानजी मारवाडी येतो]

मे आजपर्यंत मोठ्यो मोठ्यो वेपार करयो, पर ह्मारी सब इष्टेट धुळीमे चळीगयी. लुगाई चेली, छोरो चेल्यो, फक्त म्हारी येक छोरी रहीछ, इनपर म्हारा जिवनो प्रानछे, म्हारी छोरीरो नाव हिरी छे, स्वरूपामे सुंदर छे, कामकाजमे मोठी हुशारू छे, परमेसरपास अने मांगनो, ये छोरी परवणो पैसो मिळो चहिजे, म्हारा वेपार छोकाचा ल्यो. (उघड) ओ हिरी, ओ म्हारी हिरी,

[हिरी आंतून ह्मणते [कयंव भईजी.

मुलतान:—आटे आव, आटे आव.

[हिरी येते आणि उभी राहते. !

ह्मारा सत्र पैसो थानोपर है बोलो तमारी मरजी.

हिरी—भईजी आप बडे हो, आप जो करेशो मुखत्यार छ, मारजो, संभाळजो, सेंगथानाकानेछे.

मुलतान॰—यंवरे म्हारी हिरी. हिरी यंव चाहिजे.

[इतक्यांत मेघराज मारवाडी येतो]

मेघराज–जयगोपाल.

मुलता॰–जयगोपाल. आवसो बैठो. (मेघराज गादीवर बसतात.

[इतक्यांत विदूषक येतो]

विदू॰–(मनाशीं) हं आतां बर आहे हें मारवाडखात. (मुलतानजीकडे हात करून) कां शेटजी, तुमचा मारवाडी कांटा कोठें आहे ?

मुलता॰–अरे कटे है काटो ?

विदू॰–अरे असलं असलं मला समजत नाहीं. तुला हिंदुस्थानी बोलतां येते कां ?

मुलतान॰—अरे मै ऐसा बोलतो क्यंवकी किदर है काटा?

विदु॰—अर तूं पैसा घेणार आणि मला काटा विचारतोस, पण कांहो शेटजी तुह्मी आतां पैसे घेणार?

मुलतान०—आरे मैतो पैसा लेनेवाला.

विठु०—बरें आहे घ्या घ्या, चालूद्या तुमची हेमाड-पंती (जातो)

(मुलतानजी मेघराज यांचेजवळ येऊन बसतो)

मुलतान०—कंई कामपर कठे आये.

मेघराज—आवे बिनरो तपास करयो आटे आवेछे.

मुलता०-आयातो घर तमारो छे, हामारो बारनो. तमारा पाव करे लागणो.

मेघ०-कामकाजने गांठ पडेसे थेकटे, अने मेकटे.

मुल०-थे छोरीका तपास करनेके आयाछे.

मेघ०-ठीक छे.

मुलता०-हमारी येक छोरीछे, आदेखो माने छोरी दो हजार रुपया पडे छे.

मेघ०-कंई चिंता नही. दो हजार रूपिया देवसो.

[मुलतानजी खालीं हात आपटून रोकडा चाहीजो. पाछे सगाई करजो.

(मेघराज १९९० रुपायांच्या नोटा देतो आणि दाहा रुपये रोख देतो.)

मेघराज- ये छोरी आटे आव,

(हिरी पुढे जाते. मेघराज कुंकु लावतो).

(हिरी मनासी—मैतो मारवाडी लुगाईहूं परमी आता)
संगिती बोळता, पद—जाऊं कामाला ह्या चालीवर

धर्माच्या रीती ॥ आमुच्या लोकांमध्यें असती
जैनधर्मी लोक आमचे बालाजी पुजिती,
भाई बालाजी पुजिती ॥ धर्माच्या रिती
कलीमाना धर्म नसोनी ॥ कन्येला विकिती ॥
बाईगे कन्येला विकिती ॥ धर्माच्या रिती॥
प्रातःकाली वाचा न कारती अरिहंतानमीती ॥
बायांनो अरींहता नमिती ॥ धर्माच्या रिती
अवर्षणाचि वृद्धी होऊनी दक्षिणे वसती ॥
अलीकडे दक्षीणे वसती ॥ धर्माच्या रिती ॥१॥

(पडदा पडतो)

(हरभट, केशवभट येतात)

हरभट—कां केशवभट त्या मारवाड्यानं त्या मुळीला कुंकु कशाबद्दल. हो ळावलं.

केशवभट—आहो ती मागणी घातली.

हरभट—एकूण तुह्माला मारवाडी येत आहे. आँ,मग सांगा तर त्यांची हकीकत पाहूं.

केशव०—मुलतानजी जो होता, तो त्या हिरीचा बाप

हरभट—ह्मणजे त्या पोरीचा?

केशव०--होय आणि तो दुसरा जो होता त्यानें आपल्या भावाकरितां त्या मुलीवर मागणी घातली. ह्मणजे कुंकु लावलं मुळतानजी मारवाड्यानें त्या मुलीचे दोन हजार रुपये घेतले.

हरभट--ह्मणजे ते कोणापासून?

केशव०--ज्यानें कुंकु लावलं त्यापासून घेतले.

हरभट—आतां हें लग्न केव्हां होणार?

केशव०—एक दोन वर्षानें इचें लग्न होईल?

हर०—तोंपर्यंत ही मुलगी अशी राहणार, अ ब ब ब ब! ती आतांच दोन मुलांची आई आहे.

केशव०—आहा त्यांचेमध्यें चालच तशी आहे.

हर०—चला आतां पुराणाला येताना?

केशव०—चला (पडदा पडतो)

अंक २ रा समाप्त.

अंक चौथा.

रंगु गंगु तान्हे मुलासह येते.

रंगु—कांहो पण गंगुबाई तुमचे आतांसी यजमान घरीं दिसत नाहींत?

गंगु—त्यांना कायसी कुठ चाकरी आली आहे. तिकडे ते गेले आहेत.

रंगु—पण कांग तुझा बाळ्या दिवसेन्दिवस अगदीं रोड होत चालला आहे.

गंगु—परवा काशिनाथपंत वैद्य घरीं आले होते. त्यांना मी बाळ्याला दाखविला तों ते ह्मणाले, मुलाची पक्की ताकद ह्मणजे पंचवीस वर्षेपर्यंत. मग तो पंचवीस वर्षापर्यंत नाडबंद राहिला पाहिजे. मग त्याला तीं मुलें मोठीं व धिप्पाड व्हावयाचीं,

रंगु—मग आपल्याला गोदुबाईनीं सांगितलेली गोष्ट आली कां फळाला.

गंगु—कलीच मानच तस आहे. मग त्याला काय करायच, पण रंगु परवा काय झालं हे तुला आहे कां माहीत?

रंगु—काय बरं?

गंगु—आपले ते विनायकराव (बोट करून)

रंगु—बरं पुढें!

गंगु–त्यांचा मुलगा दत्त्या, त्याच वय सारं तेरा वर्षांचं; पण बाई त्याच्यावर उड्यावर उड्या पडूं लागल्या. जो तो ह्मणें माझी मुलगी करा, माझी मुलगी करा आणि त्यांचे वाड्यांत एक गरीबसा बिऱ्हाडकरू राहात होता त्याच वय सत्तावीस वर्षांचे होतें पण त्या बापड्याकडे कोणी ढुंकून सुध्दां पाहात नसे, आतां ही हळकुंडायेवढी पोरं (बोट करून) दिवाच लावणार मेलीं! आता ह्या बिच्याऱ्यानें दागीने कोठून आणावे, झाली इष्टेट कोठून आणावी, पण बाई त्याचं शरीर मात्र सुरेख आहे आँ!

रंगु–आमचा बाप तसाच होता, त्याला काडीमात्र दया न्हवती. माझें लग्नाचे वेळेस त्यानें माझे सातसे रुपये घेतले. आणि मग ते रुपये (बोट करून) त्यांना मिळण्यास मोठी मारामार पडली, ते कसे ह्मणसील तर ऐक.

गंगु०—बोल.

साकी.

घरें दारें बिकुनी सारें घेतले मजला पदरीं ॥
घरामध्यें अन्न नसोनी, फिरते दारोदारी ॥
कन्या पालकहो ॥ दुरवर दृष्टी द्या हो ॥ १ ॥

रंगु०—तिकड, त्यांनीं कायसो, भिक्षुकी आरंभिली आहे परंतु हल्लीं दिवसमानाप्रमाणें, भिक्षुकीलाही, कोणी विचरीत नाहींत. परंतु नवरा चांगला हो, आपणा-

सारख्या बायकांना, नवरा हेंच पातिवृत्य, कित्येक बायकांना, नवऱ्यानें जर येखादा नवीन दागिना केला, तर त्यांना तो दागीना आवडतो, परंतु नवरा आवडत नाहीं. आतां स्त्रियांना सुख ह्मटले ह्मणजे नवऱ्याचें, नवरा अंगानें घट्टाकट्टा असला, ह्मणजे एक उत्तम प्रतीचा दागीनाच समजला पाहिजे, मला बाई दागीन्याची बिलकूल आशा नाहीं. पोटाला अन्न, आणि अंगाला वस्त्र, शिवाय (बोट करून) त्यांच शरीर आहे असच कायम असाव, येवढ परमेश्वरापासी मागण आहे. चला बाई आतां घरांत कांहीं बघीतल पाहिजे. आता येतील.

गंगु०—मग तिसरे प्रहरी येसील कां बाजारांत? तो हिरीमारवाडणीचा नवरा कस्तूरचंद हा हिंगाचे पोते घेऊन आला आहे. त्याची मोठी आज गम्मत आहे.

रंगु०—बर आहे आपण बरोबर जाऊं.

स्थळ बाजार

(कस्तूरचंद मारवाडी खांद्यावर, हिंगाचें पोते घेऊन येतो)

कस्तूरचंद—लेरे हिंग, बे, पेषनो तोलो, बें, पेषनोतोलो, हिंग, ले हिंग, ले हिंग, ले

(असे ह्मणत आहे. तो येक ह्मातारा येतो आणि त्याचे पोटाकडे पाहून,)

म्हाता०–कां शेटजी, बरच मोठं पोट झालं आहे.

कस्तू०–अरे मोटा झाला, मोटा झाळा.

म्हाता०–बरं कां येणं केळं ?

कस्तू०–अरे बे, पेषनो तोलो. हिंग ले, हिंग ले.

म्हाता०–अरे बाबा माझ्या घरांत फोडणीला हिंग नाहीं तो तुला कोठून आणून देऊं, कां कोठें चोरी करून आणून देऊं ? मा मा मारीन तुळा.

कस्तूर०–अरे रावशाब, मे तुला हिंग ले म्हणाला,

म्हाता०–हिंग देतोस होय मळा, बर दे पाहूं ?

(कस्तूरचंद हिंग काढून दाखवितो.)

म्हाता०–अरे, यांत कांहीं पीठ बीट मिसळळेस का.

कस्तू०–अरे आटो नहींहै.

म्हाता०–बरं दे वजन करून पाहूं.

(कस्तूरचंद वजन करून देतो, म्हातारा जाऊं लागतो)

कस्तूर०–अरे पन रावशाब पेषे देवो.

म्हातारा–हं, आतां उद्या या.

(कस्तूरचंद म्हाताऱ्याजवळ येऊन)

कस्तूर०–आटे पेषे होना.

म्हातारा–एवढ्याशा हिंगाचे का आठ पैसे ?

कस्तू०–अरे नही नही, आटे पेषे होना.

म्हातारा–(मनाशी) मघा काय म्हणाळा होता बरं,

हं, बे पेषा ह्मणजे दोन पैसे. (पैसे काढून) हं हे घे. (पैसे देऊन निघून जातो. व दुसरा ह्मातारा येतो. तो कस्तुरचंदाच्या पाठीवरून हात फिरवितो.)

ह्माता०–कसें काय मारवाडी बुवा बरें आहेना ?

कस्तूर०–अरे कईकी बरा, ह्मारा सब पेषेका उब्बा गयो अने लुगाई लाई.

म्हाता०–तुला गांजा ओढायाला काज्याची डबी पाहिजे होय !

कस्तू०–नही रे नही डब्बा गयो.

म्हाता०–बरं, बिडी ओढ पाहिजेल तर.

कस्तू०–अरे नहीरे बाबा, पेषेका डब्बा गयो.

ह्माता०–तुझा डबा गेला होय ?

कस्तू०–हां हां.

ह्माता०–बरं त्यांत काय होतरे ?

कस्तू०–पेषों पेषो.

ह्माता०–पैका पैका ?

कस्तू०–हां हां.

ह्माता०–बरं, हे तुज्या खांद्यावर काय आहे ?

कस्तू०–अरे हिंगनो पोतो.

ह्माता०–बायकांच्या गळ्यांतील पोत आणि हिंग आणलास होय ?

कस्तूर०—अरे नहींरे हिंगनो पोतो.

ह्मात०—गड्या तू हें काय बोलतोस हें मला समजत नाहीं.

कस्तूर०—अरे भाई हिंगनो पोतो.

ह्माता०—हिंगाचे पोतें होय ?

कस्तू०—हां हां.

ह्माता०—तूं हिंग देतोसका ?

कस्तू०—बे पेषनो तोलो हिंग ले, हिंग ले.

ह्माता०—मग चल तर आमचे घरीं.

कस्तू०—अरे मी आतां गाणा गातो.

ह्माता०—गाणें गातोस होय, बरें, ह्मण कांहीं तरी.

कस्तूर०—

पद—चाल—दूता जा, जा जा जा झणीं.

पैसा हरी ॥ बायको हिरी ॥ हातीं हिंगाचा सौदा ॥ दुकान दिधलें ॥ स्त्रियेकरितां घर विकलें ॥ पैसा हरी, बायको हिरी, हातीं हिंगाचा सौदा ॥ मारवाडी दारा ॥ किंमत पडते हजारा ॥ पैसा हरी ॥ कन्या दान करा ॥ पैशावांचुनि फुकट नरा ॥ पैसा हरी ॥ १ ॥

असे ह्मणून निघून जातात.

(दोन गृहस्थ येतात.)

गृहस्थ—कांहो तो हिंग विकणारा मारवाडी कोण होता ?

दुसरा गृह०—ह्मणजे त्या हिरी मारवाडणीचा नवरा. हिरीच्या बापानें त्याजवळ दोन हजार रुपये घेतले, त्या रुपयाकरितां त्यानें आपलें दुकान, घर वगैरे सर्व विकले. आणि आतां हिंगाचे पोतें घेऊन हिंग विकीत आहे.

गृहस्थ—एकूण मारवाड्यांत सुद्धां पैसे घेतात ना ?

दु॰गृहस्थ—हात तेचं तुह्माला नाहीं का माहीत आहो ब्राह्मणांत वरची पायरी, ब्राह्मणात तरीं थोडे घेतात,

गृहस्थ—आणि मराठ्यांत ?

दु॰गृहस्थ—ब्राम्हणाच्या खालोखाल पैसे घेऊं लागलें आहेत ते पहा आतां भागूजीची स्थीति काय झाली ती समजेल,

[भागूजी आणि त्याचा मीत्र विठूजी येतात.]

विठूजी—कसकाय भागूजी बर हाय ना ? बर पोर बाळ कांहीं,

भागूजी—आर गरिबाला पोराला काय तोटा येकयेकाच्या पाठिमाग पाटिभर पोर मात्र दान्याच्या कनगी भरून ठेवल्या पाहिजेत,

विठूजी—बर आवंदां सेतात उत्पन्न मोप झालं असल,

भागूजी—आन ते कुनाच्या बापाला हाव हे बघा ऐका

विठूजी—म्हनजे अस कस व बोलता भागूजी

भागूजी—तुह्माला न्हाईंका ठाव जंव्हा लगीन करून बसलो तंव्हा समदी सेत सावकाराला लाऊन दिली ते कराज आझून शान फिटत न्हाई बघा पन कांहो इठूजी ते बामनावानी कोन उभेराहिल्याति, आन ते वाईस, इंग्रजीवानी बोलत्याति, बर तेवढ ऐकुंद्यात खरं

दु॰ गृहस्थ—आहो गृहस्थ पाहिलेका तुह्मी त्या मराठ्याची स्थिति

गृहस्थ—सांगावरं त्याची हकीकत,

दु॰ गृहस्थ—म्हणजे ज्या वेळी भागूजीचे लग्न झाले त्यावेळी त्याचे बापानें रंगीचा बाप जो रामभाऊ, रामभाऊने रंगीचे पैसे घेऊन त्या पैशावर लिंबाजीचे सेत गहाण लाऊन घेतले आणि लिंबाजीला भागूजीच्या हक्का करितां २०० रुपये दिले, आणि ते रुपये संताजीस देऊन संताजीचि मुलगी भागूजी यांस केली, लग्न होऊन आज बरेच दिवस झाले परंतू आझून कर्ज फिटत नाहीं. आणि त्यास खाण्याची भ्रांती येऊन पडली आहे. तरी मुलीचे पैसे घेतल्या पासून असे वाईट परिणाम होतात.

(जातात, पडदा पडतो.)

[मुलतानजीचा मित्र चिटकोबा येतो. [मनासी]

चिटकोबा—धंदा करावा तर पहा लटपटीचा. मला दुसरे धंद्यांत बिलकूल यश नाहीं पहा! परंतु आतां मात्र मला एक विचार सुचला आहे. तो कोणता म्हणाल तर आमची मुलगी हिरण्यकेशी, हिचा विवाह होणें आहे. तर हिला ज्या ज्या मागण्या येतील, त्याचेकडोन अगोदर आपण पैसे घेऊन, त्यांना मुलगी देण्याबद्दल संकल्प करावा, हें मला बरें दिसतें. मग ते कसेही नवरे असले, तरी हरकत नाहीं. आपणाजवळ पैशाचा मात्र पुरवठा होईल, मग पुढची बात पुढें.

(चिटकोबा बसले आहेत तों भालेराव येतात.)

चिटकोबा—या तुम्ही असें बसा.

(भालेराव खालीं बसतात.)

चिटकोबा—आपण कोठें असतां?

भालेराव—येथून दहा कोसावर सारंगपूर ह्मणून शहर आहे. त्या ठिकाणीं आमचें वास्तव्य आहे. आपल्या ठिकाणीं वधूचा शोध लागला आहे, ह्मणून येणें केलें आहे.

चिटकोबा—होय आमचे येथें वधू आहे खरी.

चिटकोबा—अरे गोपाळ, त्या हिरण्यकेशीला पाठवून दे पाहूं

(हिरण्यकेशी येते व थोडा वेळ उभी राहून निघून जाते.)

भालेराव—मग आपणांस यंदा लग्न कर्तव्य आहे कां?

चिटकोबा—होय, आहे. परंतु ह्या बैठकीला आपण जर सहाशें रुपये मोजाल तर लगेच ठरवून टाकूं

भालेराव—आपण बोलता ही गोष्ट बरोबर आहे खरी, परंतु आपण नवरा पाहिला नसोन इष्टेटही पाहिली नाहीं. मग कसें

चिटकोबा—आपण जर मुद्दाम आला आहांत, तर आपण खोटें सांगाल काय, कधींही सांगणार नाहीं. तर तुम्ही अगोदर सहाशें रुपये मोजा, म्हणजे मी आतांचे आतां लग्न जुळवून टाकतों.

भालेराव—बरें. आपल्या मर्जीप्रमाणें कां होईना. ह्या घ्या सहाशें रुपयांच्या नोटा, आणि द्या पावती लिहून

भालेराव—बरं थोडे थांबा, मुलीचें टिपण काढा पाहूं

चिटकोबा—अहो मुलीला काय पाहातां, आमची मुलगी देवगुणी आहे. हें घ्या पाहिजेल तर टिपण. (चि॰ टिपण देतो)

भालेराव—टिपण तर जुळल. परंतु तीथ कोणती धरणार?

चिटकोबा—तीथ दशमीची फार उत्तम आहे.

भालेराव—अहो दशमी तर अगदीं जवळ आली आहे. त्यांत आमचें सामान तर झालें पाहिजे?

चिटकोबा—मग पाहा बुवा, मला दशमीशिवाय दुसरा मार्गच नाहीं.

भालेराव—बरें. आपल्यामता प्रमाणें तीथ दशमीची ठरली आहे. हं घ्या रुपये मोजून. (चिटकोबा रुपये मोजून घेतो. व पावती लिहून देतो)

(विदूषक आणि दुसरा गृहस्थ येतो)

विदूषक—अहो जाणारे गृहस्थ, इकडे या पाहूं.

(गृहस्थ जवळ येतो)

गृह०—अरे तुझें काय म्हणणें आहे?

विदू०—आपले जे चिटकोबा आहे (थांबून) म्हणजे कोण समजला?

गृह०—हं हं हं

विदू०—हं तेच, त्यांनीं आपली मुलगी तीन गृहस्थांना देऊं केली आहे. आणि तीथ कोणती नेमली आहे म्हणाल तर तिघानांही दशमीची! हं द्या टाळी

विदू०—पुढें कांहो ह्या लग्नाचा मोठा फार्स होईल नाहीं बरें?

गृह०-अरे फार्स म्हणजे चमत्कारीक लग्न समारंभच म्हणावयाचा. बरें असो. आपणाला त्याचें काय करावयाचें आहे?

विटू०-अहों गम्मत तर पहाण्यास सांपडेल.

(चिटकोबाची स्त्री भामिनी येते. (मनासी)

भामिनी-आमचे मंडळी कायसे पैशाच्या मोठ्या गडबडींत आहेत. बरं ह्यांनीं हे पैसे आणले कोठून? (तोंडाला बोट लावून)

भामिनी-अग वर्णे, अग वर्णे, अशी इकडे ये पाहूं.

(वर्णी येते)

वर्णी-कांग आई मला तूं हाक मारली ?

भामिनी-(बोट करून) अग त्यांनीं ह्या थैल्याच्या थैल्या रुपये आणले, ते कोठूनग ? ह्याची कांहीं तुला माहिती आहे का?

वर्णी-किनई आई बाबा कायस, बोलत होते कीं, हिरण्यकेशीला तीन नवरे आले आहेत.

भामिनी-मग खरोखर स्वारीनी लाट मारली, आतां हा खुलासा रात्रीं कळेल, अहो जित्याची खोड मेल्याशिवाय कधीं ही जाणार नाहीं, हें अगदीं पक्क समजलं पाहिजे. (जाते)

(चिटकोबा येतात) मनासी.

चिटकोबा—आम्ही हें लफड् केलं आहे खरं, परंतु तें गळ्यांत यायला करते.

मुंबईत मजा गमतीची–ह्या चालीवर

मानवा बुद्धि ती होणें, ईश्वरी क्षोभचि असणें ॥ वर पुरुष तीन पाहोनी । बहुतची पैसे घेऊनी ॥ दश-मीचि तीथ ठरवोनी । पडे अनाथ मी विचारा ॥ ईश्वरी क्षोभचि असणें ॥ मानवा० ॥ चाल ॥ माधवा त्वरित ये क्षणीं । रक्षि हे जनीं । दीन पाहोनी ॥ पडे अनाथ मी विचारा ॥ ईश्वरी० ॥ १ ॥

चिटकोबा—परमेश्वरा, आतां मात्र ठीक दिसत नाहीं. कोठें लपून बसावें तर घरांत माझेशिवाय दु-सरें कोणी मनुष्य नाहीं. आतां ते आमचे मुलीस पाहि-लेले तीन नवरे ह्मणजे ते साक्षांत यमाचा अवतारच ह्मणा-वयाचे ! ते आतां केवळ माझे छातीवर येऊन बसणार ! बसणार ! बसणार ! ! देवा आतां मी काय करूं ? (रडूं लागतो) लोक अशा मंगलकार्यांत मोठ्या आ-नंदांत असतात आणि मी रडत बसलों आहे ! परंतु हें दुश्चिन्ह दिसत आहे ! काय होईल कोण जाणें ? मी चांडाळानें असें काम केलें तें माझें मनाला खात आहे !

[इतक्यांत भिवराव येतात.]

भिवराव–का चिटकोबा आतां तुह्मी बराच उद्योग करून घेतला किनई ?

चिट॰–काय करूं भिवराव, आतां मला कांहींएक सुचत नाहीं. तुह्माला कांहीं युक्ति सुचत असल्यास ती मेहरबानी करून मजकरितां शोधून काढा आणि मला ह्या संकटांतून सोडवा.

भिव॰–आतां तुह्मी असें करा कीं, प्रथम मांडव घालून भोंवलें वगैरे सर्व जय्यत तयारी करून ठेवा आणि मग तुम्ही जा पळून. नवरे आले ह्मणजे मी आहे आणि मग त्यांचेकडील मंडळी आहेत.

[चिटकोबा मांडव भोंवलें वगैरे सर्व तयारी करतो, इतक्यांत ताशा, वाजंत्री यांचा गजर ऐकूं येतो]

चिट॰–(घाबरून) हो, आले, आले हो आले. आतां कोठें जाऊं व कोठें लपूं ! (चिटकोबा जातो, त्याचे पाठीमागून चिटकोबाची स्त्री आणि मुलगी अशीं निघून जातात.)

[तिन्ही नवरे वाजत गाजत येतात.]

नवऱ्याकडील मंडळी–अहो, व्याह्याकडील मंडळी कोणीच येत नाहींत. काय भानगड आहे ती कांहीं समजत नाहीं.

रस्त्यावरील लोक-ते आह्माला कांहीं माहीत नाहीं.

[नवऱ्याकडील मडळी चिटकोबाचे घरीं येतात आणि नवरी कोठें आहे, नवरा कोठें आहे असा एकच कल्लोळ होतो व तिन्ही नवऱ्याकडील मंडळांमध्यें तंटा उपस्थित होतो.]

एक-आमची नवरी !

दुसरा—आमची नवरी !

तिसरा-आमची नवरी !

[इतक्यात पोलीस लोक जमा होतात व चिटकोबाचे घ-रांत तपासास सुरवात होते. चिटकोबास धरतात आणि आफिसामध्यें घेऊन जातात. पडदा पडतो.]

स्थळ—साहेबांची कचेरी.

[शिपायी लोक वगैरे मंडळी, साहेब खुर्चीवर येऊन ब-सतो, व थोडा थांबून उभा राहतो.]

साहेब-ग्रंठकर्टा ह्मणटो, कोणाचाही ढर्म अषो ट्याला शरकारची मडट पाहिजे. आटा टी मडट शर-कारांनी कोणढ्या रूपानें ज्यावी, याजबडल मी नाटक-रूपानें करून डाखविटो. मग ह्याप्रमाणें कोणी करो अठवा न करो. माझें कर्टव्य आहे. ट्याप्रमाणें मी षमाजाचे ठिकाणीं करून डाखविटो. आटां ढर्मशास्ट्रा-मढ्यें मोठी शिक्षा ह्मणजे प्रायश्चीत, अपंक्ट आणि

डंड यावर जास्ट कांहीं णाहीं. ह्मणून ढर्मषास्त्राप्रमाणें आपण इनषाफ करूं. [टाळी देतात. व टाळी होते,

[साहेब खुर्चीवर बसतो]

साहेब–शिपॉयी,

शिपायी–जी साब हबर है.

साहेब–लग्नाशमंढानें सटल्याटील षर्व मंडळी हजर है ?

शिपा०–होय साहेब, हजर है.

साहे०–शिवरामभट दलाल बुलाव.

शिपा०–शिवराम डलाल हजर है, शिवराम,

(शिवरामभट साहेबाजवळ येतो)

साहे०—ठुमचा गुरु कौन है?

शिव०–आमचा गुरु शंकराचार्य.

साहे०—ठुमच्याजवळ डलाली करण्याविषयीं शंकराचार्याचा हुकूम है ?

शिव०–नाहीं साहेब. ! साहेब लिहीतो]

साहे०—मग ठुमी लग्नासंबंढानें डलाली कां केली ? जाव.

साहे०—ठकु मावशीला बुलाव.

शिपा०—ठकुमावशी हजर है ? ठकूमावशी

(ठकू मावशी येते.)

साहे०—ठुमचा गुरु कोन है ?

ठकु–आमचा गुरु शंकराचार्य.

साहे....तुमी ह्मातार्‍या नवर्‍याला मुलगी देण्यावि-षयीं दलाली करण्याबद्दल तुमचे जवल शंकराचार्याचा हुकूम है ?

ठकु०—नाहीं साहेब. (साहेब लिहीतो)

साहेब—मग तुह्मी असे कां केले. जाव

साहेब—रामभाऊ मुर्तीजापुरकर बुलाव.

शिपाई—रामभाऊ मुर्तीजापुरकर हजर है. रामभा-ऊ मु० (रामभाऊ मुर्तीजापुरकर साहेबाजवळ येतो.)

साहे०—तुमच्या गुरू कौन है ?

रामभाऊ—आमचा गुरू शंक्राचार्य.

साहेब—तुमाला मुलीचे पैसे घेण्याविषयी शंक्रा-चार्याचा हुकम है ?

रामभाऊ—नाहीं साहेब. (साहेब लिहीतो)

साहेब—मग तुमी मुलीचे पैसे कां घेटले. जाव

साहेब—संटाजी पाटील बुलाव.

शिपायी—संताजी पाटील हजर है संताजी पाटील

(संताजी येतो.)

साहेब—तुमच्या गुरू कौन है ?

संताजी०—आमचा गुरू शंक्राचार्य.

साहेब—तुमाला मुलींचे पैषे घेण्याविषयीं शंकराचार्यांचा हुकूम है ?

संताजी०—नाहीं साहेब. (साहेब लिहीतो)

साहे०—मग तुमी मुलीचे पैषे कां घेटले. जाव

साहेब—मुलटानजी मारवाडी बुलाव.

शिपायी—मुलतानजी मारवाडी हजर है मुलतान०

(मुलतानजी मारवाडी येतो.)

साहे०—तुमच्या गुरू कौन है ?

मुलतान०—हमारा गुरू मारवाडी.

साहे०—तुमाला मुलींचें पैषे घेण्याविषयीं तुमच्या गुरूचा हुकूम है ?

मुलतान०—नहीं साब. (साहेब लिहीतो)

साहे०—मग तूमी मुलींचे पैषे कां घेटले ? जाव

साहेब—चिटकोबा पाळवेलीकर बुलाव.

शिपायी—चिटकोबा पालवेलीकर हजर है ? चिटकोबा

(चिटकोबा येतो.)

साहेब—तुमचा गुरू कौन है ?

चिट०—आमचा गुरु शंकराचार्य.

साहेब—तुमची मुलगी अगोडर कोणाला डिली ?

चिटको०—श्री व्यंकटेशाला. (साहेब नांव लिहून घेतो.)

साहेब–ठुमी किटी नवऱ्याचे रुपये घेतले? व टे किटी?

चिटको०–तीन नवऱ्याचे रुपये अठराशें.

साहे०–त्यापैकीं बाराशें रुपये काढ.

चिटको०–रुपये घरीं आहेत साहेब.

साहे०–आना रुपये.

(चिटकोबा रुपये आणण्यास जातो व रुपये आणतो.)

साहे०–ठुमी अषे जे रुपये लोकांपासून फषून घेटले असे करण्याबद्दल ठुमचेजवळ शंकराचार्यांचा हुकूम है ?

चिट०—नाहीं साहेब.

साहेब–(लिहून घेऊन) जाव. [साहेब उभा राहून] आठा चिटकोबा पानवेलीकर यानें आपली मुलगी तीन नवऱ्यास डिली, याजबद्दल निकाल असा देटो कीं, तिन्हीं नवऱ्यांपैकीं चिटकोबानें प्रठम नवरा श्रीव्यंकटेश यास आपली मुलगी डेऊन त्याजवळ याची पावटीही अगोडर झाली है. आणि डोन्ही नवऱ्याच्या पावत्याही पाठीमागून झाल्या है. टरी त्या डोन नवऱ्यांस आह्मी अषा निकाल डेटो कीं ठुमाला श्रीव्यंकटेशाचे पाठी मागून चिटकोबानें मुलगी डेण्याचें कबूल केलें आणि ठुमची पावटीही श्रीव्यंकटेशाचें पाठीमागून झ्याली है. शबब ही णवरी श्रीव्यंकटेशाची है अषे सिद्ध होटे. ठुनी आपले बाराषे रुपये घेऊन जा. श्रीव्यंकटेशाचे मं

डळीस हुकूम (मंडळीकडे बोट करून आटा ही नवरी ठुमची झ्याली है. ठुमी जाऊन लगीन लावा. सिपायी,

शिपायी–जी साब.

साहेब–सिवरामभट डळाल, ठकू मावशी, रामभाऊ मूर्टिजापूरकर, संटराम पाटील, मुलटानजी मारवाडी इटक्या इसमांना बुलाव.

शिपायी–चलाहो या वर.

(सर्व साहेबाजवळ येतात.)

साहेब–(बोट करून) हें पहा ढर्मशास्ट्राचा कायडा मोठा खराब है. टरी ठुमी मुलीचे पैषे घेऊ नये, डलाली करूं नये, झाटाऱ्या गृहस्ठाना णवरी डेऊ नये. नवऱ्यास हुंडा डेऊ नये हें ठुमास आह्मी एक वेळ टाकीड डेऊन पाहटो. पुढें आह्मी ऐकणार णाहीं. चले जाव.

[साहेब जातो, कचेरी बरखास्त.]

(पडदा पडतो.)

स्थळः—लग्नसमारंभ.

[चिटकोबा, शिवरामभट दलाल, ठकू मावशी, रामभाऊ मूर्तिजापुरकर व वराकडील मंडळी वगैरे येतात.]

[अक्षता वाटतात व अंतरपाट धरतात.]

लग्नाचा सोहोळा कसा सुजनहो न्यायेपरी ह्या जना
नवऱ्याला वधु कैसी शोभते जशी आकाशी तारांगणा

वऱ्हाडाची गर्दी कशी जमलिही वधुवरा पाहण्या
आशीर्वाद आह्मि देतो पंडित गुरु द्यावी अह्मां दक्षणा
॥ शुभमुहूर्त सावधान ॥
आतां सुजनबंधु मंडळी तुम्ही सावध व्हा तें कसें
कन्यादान पुढें मागें तुह्मी करणें पुण्यासी जोडा कसें
॥ शुभमुहूर्त सावधान ॥

टाळी होते, वाद्यें वाजूं लागतात. थांबून मंडळी ओ-ळीनें उभी राहतात.

पद—मूर्तिमंत भीति—ह्या चालीवर.

मदीय धर्मबंधु हो तुह्मा असे हि प्रार्थना ॥ सभा भ-रा करावया, सभा भरा करावया सामाजिकीं सुधा-रणा ॥ मदीय० ॥ स्वकन्यका विकूं नका, स्वक-न्यका विकूं नका पतीस दान ती करा ॥ मदयि०॥ मतैक्य आधि होऊं द्या, मतैक्य आधि होऊंद्या श्रीनि देश स्वीकरा ॥

(अंक चौथा समाप्त.)

अंक ५ वा.

स्थळ—सार्वजनिक रस्ता.

आवंती महाल, सभामंडळ.

(दोन गृहस्थ येतात.)

गृह०—अहो गृहस्थ, आज ह्या ठिकाणीं लग्नसमारंभाची सभा होणार आहेना ?

दु० गृ०—होय, आज सायंकाळीं ९ वाजतां अवंती महालामध्यें भरणार आहे.

गृह०—त्यांत काय काय विषय निघणार आहेत ?

दु० गृ०—अलीकडे लग्नासंबंधानें बरेच घोटाळे होऊं लागले आहेत. ह्मणून कांहीं मंडळीचीं भाषणें होऊन काय तो निर्णय ठरविण्यांत येईल.

गृह०—ठीक आहे. तर मग येतां कां आपण ?

दु० गृ०—चला. (जातात)

[वामनराव, गोपाळराव, माधवराव, सुरजमळ मारवाडी यादवराव पाटील, गंगाबाई, सरस्वतीबाई, भागीर्थीबाई, अशी मंडळी येतात नंतर गंगाधर शास्त्री सभेच्या मुख्य ठिकाणीं विराजमान होतात]

(गोपाळराव उठून उभे राहतात.)

गोपाळ०--पूर्वीचे लोक फार भोळे व अज्ञान होते. ह्मणजे तीस वर्षांपर्यंत मुलास लग्न ह्मणजे काय आणि बायको करावी कशाकरितां हें त्यांस समजत नसें आणि अशापासून मुलें मात्र धिप्पाड व सशक्त व्हांवयाचीं. हा मात्र एक कित्ता घेण्यासारखा आहे. पूर्वीं लग्नास विशेष पैसा खर्च करीत नसत. मुलगा पाहणें ह्मणजे त्याचे घरीं दोन शेतें, राहण्यास झोंपडी व अंगानें सशक्त असे पाहून मुलगी त्यास द्यावयाची.

(विदुषक येतो.)

विदुषक०—कांहो; माझें वय किती असावें ?

दुसरा०—असेल पन्नास वर्षांचें.

विदुषक०--तुह्मी तर राव लागला आह्माला ह्मातारे ह्मणावयाला, आह्मी का म्हातारे आहोत

हें पहा एकदा काय झाल, बेलीयाची बाटली समजून, आह्मी एकदम घासलेटाची बाटली डोक्यावर भडभड भडाभड ओतून घेतली, मग त्या सुगंधाला कांहीं पारच नाहीं. बघा तेव्हांपासून माझें हें केस पांढरे झाले आहेत. म्हणून मी का म्हतारा आहे? आंहो मी तरणा, तो तरणाच (जातो)

(वामनराव उठून उभे राहतात.)

वामन०--गोपाळरावांनीं आता जे, भाषण केलें ते

अगदी बरोबर आहे. परंतु अलिकडे लोकांजवळ कांहीं त्राण नाहीं. मग त्यांनी मुलींचे पैसे कां घेऊ नयेत ?

गोपाळ०—पैसा घेतल्यापासून, घरें दारें जमिनी नाहींशा होऊन लोक भिकेस लागले हें आताच्या नाटकावरून, आपणाला कळून आलेच असेल. शिवाय अशी कल्पना करा कीं, तुम्हाला मुली आहेत. म्हणून तुह्मी पैसे घेतां, मग आम्हाला तर मुळीच मुलगी नाहीं. आणि त्यांत आह्मी तुमच्यापेक्षाही, गरीब आहोंत. मग आह्मी कोणाचे पैसे घ्यावें त्यापेक्षां भिक्षा मागणें बरे ? आहे. परंतु हा पातकाचा घडा कोणी सिरावर घ्यावा ?

माधवराव०—लग्नांत विशेष पैसा खर्च करू नये. असें जे आपण सांगितलें ते काय म्हणून ? शिवाय पैशावाचून लग्न कसे होईल, पूर्वी नुसती फुलांची माळ नवरीनें नवऱ्यास घातली म्हणजे लग्न झालें. मग त्याप्रमाणें आपणांस करावयाचे का ?

गोपाळराव०—हा एक रूढीमार्ग आहे. त्या रूढीच्या बाहेर आपणांस वर्तन करता येत नाहीं. परंतु लग्न करण्याचें कामी जितका आपण पैसा खर्च कमी करावा, तितका आपला मोठा फायदा आहे. आणि लग्नांत विशेष पैसा खर्च केल्यानें उलटा तोटा आहे.

झाला उदाहरण पूर्वीचे जुनें मनुष्याचें हे होय, आपणा ला जर जास्त पैसे लग्नाप्रित्यर्थ खर्च करण्याची ऐपत असेल तर त्यांनी गरीबाचें लग्न करणारी साह्यकारी मंडळी, असी कमेटी नेमून त्यांनीं धर्मार्थ लग्नाकरितां फंड उभारून त्या फंडामध्यें रकमा जमा करीत जाणें. असी कमेटी, ब्राम्हणांत, मराठ्यांत, आणि मारवाड्यांत झाली पाहिजे, त्या कमेटीचें काम म्हटलें म्हणजे दरसाल अमुक जिल्ह्यांत, आमूक तालुक्यांत बिन लग्नाचे मुलगे किती. आणि मुली किती, त्यांचीं लग्नें गरिबीमुळे राहिलीत किंवा कसी ह्याजबद्दल तपास करणें. याकामांत सरकारची मात्र मदत पाहिजे, परस्पर जातीची लग्ने त्यांच्या त्यांच्या धर्माप्रमाणें झाली पाहिजेत. आणि दरसाल धर्मार्थ लग्ने किती झाली, ह्याजबद्दल त्या कमेटीनें नोंद ठेविली पाहिजे. आपण सर्वत्रांनी लग्न बाबती एक विचाराने राहिलों. तर त्यात मोठे पुण्य आहे. आणि मोठा फायदा आहे.

(टाळी होते.)

गंगाबाई०—अलिकडे परमेश्वरी क्षोभामुळें आज आठ वर्षे झाली, आमचे नवरे प्लेगमध्यें मरण पावलें आज नाहीं म्हटलं तर तीन हजार बायको ह्या शहरा-

मध्यें रंडकी झाली आहे. ह्यांनी व्यवस्था काय केली पाहिजे ?

गोपाळराव—पुनर्विवाह करण्या संबंधानें पूर्वीपासून फारसा रूढी मार्ग नाहीं आणि लोकांना मोठी शंका उत्पन्न होते, ह्मणून ह्याचा निर्णय शास्त्रीबावा काय करतील ते खरें.

(विदूषक येतो.)

विदु०—कांहो मला एक पुनरविवाहाच्या दोन चार बायका करावयाच्या आहेत. हुकूम मिळेल काय?

एक गृह०—अरे तूं वेडा तर नाहींस, तुला दोन चार बायका, कायकरावयाच्या आहेत? एक बायको बस्स आहे.

विदू०—हे पाहा एक पाहिजे पाणी आणावयाला आणि दुसरी पाहिजे सेत कामाला, तिसरी पाहिजे स्वयपाकाला आणि मग चौथी पाहिजे स्वतःला आणि मग बायकांचें जिवावर आह्मी राजे.

गृह०—अरे पुनरविवाह कोणी करतंका, पाहिजेल तर लग्न कर.

विदू०—अहो एक मोठी गमत झाली, मोठी गमत झाली ह्मणजे काय झालं आह्मी केली एक पुनरविवाहा-

ची बायको, तीपण फार सुंदर होती, पुढें तिच्या मध्ये आणि आमचे मध्ये झाला बेबनाव पुढें कांहीं दिवसानी आह्मीं मेलो. आणि आतां इतक्यांत जिवंत झालो पाहा.

गृह०-मेलेले मनुष्य पुन्हां कसे जिवंत होईल.

विदू०-आहो आह्मी तर मेलोच, परंतु ह्या पुनरविवाहा संबंधानें काय काय खडबडी होतात हें पाहाण्या कारितां आलो आहे. मग काहो, तुम्ही तूर्त कांहीं हुकूम देत नाहीं म्हणावयाचे.

गृह०-हुकूम देण्याला तूर्त मार्ग दिसत नाहीं. [विदूषक जातो] सुरजमल मारवाडी येतो.

सुरजमल—हामारा जातमे पैसो लेवोनरी चालपडी है जिनसु हामारा पंचानें पंचायत करेने, पैसो लेवोनरी चाल बंद करेनें इति हात जोडने विनंती है.

(सरस्वतीबाई उठून उभी राहते)

सरस्वती०—अलिकडे जारकर्म फार वाढत चालले आहे. तरी बाजारांत बसणाऱ्या स्त्रीयांनीं आपआपली लग्न करूग ध्यावी. स्त्रीयांनीं सिक्षण घेऊ नये, सिक्षण घेतल्यापासून पुरषांचा बोज राहत नाहीं, आह्मी किति जरी झालों तरी स्त्रियाच. आह्माळा सिक्षण कशाला पाहिजे, पुरुष जे करतीळ तो पूर्वदिशा. (टाळी होते)

(गंगाधरशास्त्री उठून उभे राहातात.)

गंगाधर०—आज तारीख ३९ पांच वाजण्याचें सुमारास लग्नसमारंभाबद्दल सभा झाली, तरी मी नाटकांतील सभामंडळीस निर्णय ठरवितो तो येणेंप्रमाणें—

मुलाचें वय निदान पंचवीस वर्षांचे झाल्या खेरीज लग्न करूं नये.

लग्नामध्यें तो मुलगा सशक्त असला पाहिजे.

लग्नाचें कामीं विस्शेष खर्च करूं नये गरीबाचें लग्न करणारी साह्यकारी मंडळी स्थापन करावी, फंड करावा दरसाल त्या फंडांतून गरीबांची लग्नें करून द्यावी, मुली चे पैसे घेऊ नयेत.

मुलास हुंडा देऊं नये, लग्नांत मुलीचें वय निदान आठ किंवा दहा वर्षांचें असावें, जास्त नसावें, पुनर्विवाहा-संबंधानें शास्त्रांत लिहिलें आहे. परंतु पूर्वींपुनर्विवाहासंबं-धानें फारसा रूढीमार्ग चालत आला नाहीं. सबब पुनर्वि-वाह करूं नये हें सिद्ध होतें. इतक्यावर कलीच्या मा-नाप्रमाणें जें जें होईल तें तें आपण पाहतच आहोत.

(एक बारा वर्षांचा मुलगा येतो.)

पहा, आह्मीं लहान मुलें, ज्याप्रमाणें आईबाप आणि

शिक्षक आह्मांला शिक्षण देतील, त्याप्रमाणें आह्माला अर्थातच शिक्षण घडून यावयाचें हें उघड आहे. पहा, लहानपणीं लग्न करणें ह्मणजे हें एक आईबापाचें शिक्षण आहे. आणि त्याप्रमाणें आह्मी त्यांचे डोक्यावर बसत आहोंत, हें सर्वत्रांस महशूर आहेच. अहो गोंद्याचें लहानपणीं लग्न केलें ह्मणजे ते अर्थातच गोविंदपंत होणार. मग गोविंदपंत आपले बापाची किंवा आईची पर्वा ठेवतो कशाला ? मग ऐटींत तोंडामध्यें विडी, आणि मुलगे कडेवर घेऊन बापाचे मांडीशीं मांडी लावून बसावयाचे. तरी मुलाचें लग्न त्याला कांहीं ज्ञान अथवा विचार समजूं लागल्याखेरीज करूं नये. आतां असें ज्ञान अथवा विचार पंचवीस वर्षाखेरीज समजूं लागणार नाहीं ही गोष्ट सप्रमाण आहे. तरी येथून पुढें आमचे प्रियबंधु मुलगा पंचवीस वर्षांचा आणि मुलगी अकरा वर्षांची असा जोडा पाहून लग्न केल्यास त्यांचा मोठा फायदा होणार आहे. आतां दुसरा विषय सर्वत्राला सुख समसमान मिळालें पाहिजे. मग ती स्त्री असो, अथवा पुरुष असो; मग ते ब्राह्मण असोत, अथवा मराठे असो, किंवा मारवाडी असो, अथवा कोणीही असो; सुख ह्मणजे समसमान असलें पाहिजे. याजबद्दल

मोठमोठे गृहस्थांनीं सभा करून याचा निर्णय केला पाहिजे. लग्नावांचून कोणी राहूं नये असा कांहीं धरबंद ठेविला पाहिजे. मुलीचे पैसे घेऊं नयेत, हुंडा वगैरे देण्याचें बंद करावें. लग्नास विशेष पैसा खर्च करूं नये, कोणी श्रीमंत असल्यास त्यांनीं आपला पैसा प्रयोजनाचे कामीं खर्च करावा. ह्यांत मोठें पुण्य आहे. वेश्यांचे बाजार बंद असावे. ह्मणजे त्यांनीं परस्परांनीं आपापलीं लग्नें करून घेतलीं पाहिजेत. विधुर अथवा विधवा स्त्री याजबद्दल मी कांहीं सांगू शकत नाहीं. याजबद्दल सर्व हिंदुसमाज मंडळी जें काय ठरवितील तें मला मान्य केलें पाहिजे. (टाळी)

(समाप्त.)

आभार.

खालीं लिहिलेले गृहस्थांनीं मजला पुस्तकास योग्य आश्रय दिला ह्मणून मी त्यांचा फार फार आभारी आहें.

पुस्त. प्रती.

२ ना० बाळ गंगाधर टिळक.
४ रा. रा. बाळा साहेब चिपळूणकर.
८ ,, बापू बाळकृष्ण खराडकर.
८ ,, नारायण रामचंद्र पावळकर कंत्रा.
८ ,, काकुराम भाऊमनसाराम नाईक.
८ ,, पांडुरंग रामजी बारी.
८ ,, हिरालाल रामलाल नाईक.
८ ,, केशव भगवंत खळदकर.
२ ,, शितारामपंत सुदामे.
८ ,, लक्ष्मण रघुनाथ करळे कॅंट्रॅक्टर.
८ ,, रूपचंद हंसराज मारवाडी.
२ ,, विष्णु श्रीपत देशपांडे आणि कंपनी.

बाळकृष्ण मनोहर प्रभुणे.